वृत्तपत्राचे नांव :– गांवकरी

वृत्तपत्र प्रकाशनाचे ठिकाण :– नाशिक

वृत्तपत्र पान क्र :– पुरवणी 2

दिनांक :–02/02/2010

# 'ऋग्वेदाने विज्ञानाची ओळख करून दिली आहे'

**पुणे-** ऋग्वेदाने विज्ञानाची ओळख करून दिली आहे. 'लॉ ऑफ फिजिक्स' हे सगळीकडे एकच आहे, असे मोठे शास्त्रज्ञ सांगतात. पण ऋग्वेदाने हे आधीच सांगितले आहे, असे ज्येष्ठ संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी सांगितले. डॉ. शरच्चंद्र इंगळे लिखित 'अ वे टू दी हार्ट ऑफ ऋग्वेद' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. भटकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पं. वसंत गाडगीळ यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. भटकर म्हणाले, 'विज्ञान आणि वेद एकच आहे, असं वेदाने मान्य केलं आहे, पण विज्ञान त्याचे पुरावे मागते. निसर्गाची सत्यता काय आहे, हे शोधण्याचा प्रयत्न सध्या भौतिक शास्त्र करत आहे. सूत्रसंचालन स्मिता इंगळे यांनी केले.